# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen property**

**Police Station** :- **Manora**

**Date of Good Work done** :- **08/02/2023**

**Brief of the work done :-**

मोटार पंप चोरी प्रकरणातील आरोपींना मुद्देमालासह अटक.



मानोरा : अटकेतील आरोपीसह पोलिस व जप्त केलेले मोटारपंप.

## मोटरपंप चोरीप्रकरणी दोन अटकेत

मानोरा : पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या हनुमान पिंपरी येथील नळ पाणीपुरवठा विहीर वरील दोन विद्युत मोटरपंप चोरी करून नेल्या प्रकरणी ठेकेदार गणेश दत्तात्रय पांढरकर यांनी मानोरा पोलिस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीवरून दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून डिबी पथकाने अटक केली. पोलिसांनी प्रकरण तपासात घेतले आहे. पोलिस सूत्राकडून प्राप्त माहितीनुसार मानोरा तालुक्यातील पिंपरी हनुमान येथील नळ पाणीपुरवठा योजनेच्या विहिरीचे खोदकाम बांधकामचे काम दिग्रस येथील ठेकेदार गणेश दत्तात्रय पांढरकर यांनी घेतले आहे. विहिरीमधील पाणी उपसा करण्यासाठी फालखन कंपनीची पाच व एक हार्सपॉवरची विद्युत मोटार बसविली होती. ती विद्युत मोटारपंप कोणीतरी अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याची फिर्याद गणेश पांढरकर यांनी मानोरा पोलिसात दिली. वाशीम स्थानिक गुन्हे शाखा व डी बी पथकाने पिंपरी हनुमान येथील आरोपी लखन बीबीचंद राठोड व अंकुश काटे यांना ६ फेब्रुवारीला अटक केली.